**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या हिंगोली जिल्हयातील हिंगोली, कळमनुरी, वसमत व औंढा नागनाथ तालुक्यातील १५ प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक ०५/०१/२०२२ रोजी सकाळी ११:३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

.................................................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या हिंगोली जिल्हयातील हिंगोली, कळमनुरी, वसमत व औंढा नागनाथ प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक ०५/०१/२०२२ रोजी सकाळी ११:३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्री. जितेंद्र पापळकर,**<br>जिल्हादंडाधिकारी हिंगोली. | : | अध्यक्ष |
| २. | **डॉ. प्रविण जोशी,**<br>प्रादेशिक आधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद. | : | सदस्य |
| २. | **श्री. सो.म. कुरमूडे**<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, परभणी | : | समन्वयक |

हिंगोली जिल्हयातील हिंगोली, कळमनुरी, वसमत व औंढा नागनाथ तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळुघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०५ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, हिंगोली यांचा, हिंगोली जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. २६/११/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे असे नमूद केले. सदर बाबतची जाहीर सुचना दि. ३/१२/२०२१ रोजीच्यो दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
- जिल्हा उदयोग केंद्र, हिंगोली.
- जिल्हा परिषद, हिंगोली.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय हिंगोली, कळमनुरी, वसमत व औंढा नागनाथ.
- ग्रामपंचायत कार्यालय - तालुका हिंगोली - आमला, खेड, हिंगणी तालुका वसमत – माटेगाव, सावंगी, सोन्ना तर्फे हटटा, तालुका औंढा नागनाथ- पुर-१, चिमेगाव, नालेगाव,

दरेगाव, अंजनवाडी तालुका कळमनुरी- चापनाथ, नंदापुर, सालेगाव (पश्चिम), दिग्रस उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी.

- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.
- (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन अदयाप पर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ परभणी यांचेकडे वाळूघाटाबाबत कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथवा लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्षांच्या परवानगीने, त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. एनाकॉन लेबोरटरीज प्रा. लि. नागपुर, श्री. निखील ओक, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता. आणि पूढे सांगितले की, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण- २०१९/ पी.के.०१/ता.के. ३ दि. ३ डिसेंबर, २०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते. हिंगोली जिल्हयातील हिंगोली, कळमनुरी, वसमत व औंढा नागनाथ तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात

आली आहे. कुदळ, फावडे, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. कूठल्याही मशिनरीचा वापर केला जाणार नाही. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. फक्ता टॅक्टर ट्रॉली द्वारे नदीपात्रातून वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण राखण्यासाठी  खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल.  व्यावसायीक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

सदर वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तालुका हिंगोली-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | आमला | २९७,२९६,२९५,२९४,२९३,२९२,२९१,२९० | ३६०x३०x०.५ | १०८०० | १९०८ |
| २ | खेड | १६४, १६३, १६१, .१६०, १५९, १५८, १६ टंच, १५२, १५१, १५०, १४९ | ४००x२५x०.५० | १०००० | १७६७ |
| ३ | हिंगणी | ५४, २७४, २७३, २७२, २७१, २७०, २६९, २६८ | ४००x३०x०.६० | १२००० | २५४४ |

**तालुका वसमत-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | माटेगांव | २, ३, ४, ५, ६, ७, ८ | ४४०x४०x०.५ | १७६०० | ३११० |
| २ | सावंगी बु. | ३८, ५५, ५६, ५९, ६१, ६२, ६४, ६५ | ५८०x२५x०.५० | १४५०० | २५६२ |
| ३ | सोन्ना तर्फे हटटा | ४, ५, १५२, १५३, १५६, १४१, १४६ | ३७१x३०x०.५० | १११३० | १९६६ |

**तालुका औंढा नागनाथ-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुर | ५९, ६०, ६३, ६४ | ४३५x२५x०.५ | १०८७५ | १९२१ |
| २ | चिमेगांव | १, २, ३, ४, ५, ६, ७, ८ | ४७५x३५x०.५० | १६६२५ | २९३७ |
| ३ | नालेगांव | २५५, २५३, २५२, २४० | ४६०x३०x०.५० | १३८०० | २४३८ |
| ४ | दरेगांव | ८, ९, १०, ११ | ३७८x३०x०.५० | ११३४० | २००४ |
| ५ | अंजनवाडी | २०७ ते २११ व २१३ ते २१८ | ५००x४०x०.५० | २०००० | ३५३४ |

**तालुका कळमनुरी-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | चापनाथ | ५५, ५६, ५७, ५८, ६०, ६१ | ४५०x५०x०.८ | २२५०० | ६३६० |
| २ | नंदापुर | ४१२, ४१४, ४१५, | ५००x३०x०.५० | १५००० | २६५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ४१७, ४१८, ४१९, ४२०, ४२१, ४२२, ४२६ | | | |
| ३ | सालेगांव (पश्चिम) | १८६, १८७, १८८, १८९ | ५१०x४०x०.५० | २०४०० | ३६०४ |
| ४ | दिग्रस त.को. | ३४, ९/१, ८/२, ८९, ८९/१, ८८/१ | ४८०x३०x०.५० | १४४०० | २५४४ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान हिंगोली जिल्हयातील हिंगोली, कळमनुरी, वसमत व औंढा तालूक्यातील सहभागी लोकांनी प्रश्ना उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री. बालाजी नारायणराव वानखेडे, रा. पुर, ता. औंढा, जि. हिंगोली** यांनी यांनी सुचित केले की, नदीपात्रातील वाळुचा लवकरात लवकर लिलाव झाल्यास अवैध उत्खननास आळा बसेल. गत वेळेचा झालेला लिलावाचा गौणखणिज निधी मिळाला नाही , तो मिळावा असे सांगीतले.

श्री जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, गौणखनिज निधी मिळणे करीता विकास कामाचा प्रस्ताव तयार करुन दाखल करावा निकशाप्रमाणे नियमाअंतर्गत निधी वितरीत करण्यात येईल असे सांगीतले.

श्री. बालाजी नारायणराव वानखेडे, रा. पुर, ता. औंढा, जि. हिंगोली यांनी सांगीतले की, पुर हे गांव तीन तालुक्याच्या सरहदीवर असल्याने अवैध वाळु उत्खननाच्या प्रकरणात कार्यवाही होत नाही. तेव्हा संबंधीत विभागाने वेळेवर उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

श्री जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, गावस्तरावर असलेल्या विविध गठीत समितीमार्फत वेळोवेळी दक्षता घेवुन अवैध उत्खनन होणार नाही याची काळजी घ्यावी. गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडुन अवैध उत्खनन होणार नाही याबाबत गावस्तरावर जनजागृती करावी.

श्री रविंद्र मारबत्ते, जिल्हा गौण खनिज आधिकारी यांनी सांगीतले की, ज्या वाळुघाटांचा लिलाव झालेला आहे त्याचा गौणखनिज विकास निधी वाळु निर्गती धोरण २०१९ प्रमाणे वितरीत करण्यासाठी कार्यवाही केली जाईल.

२. **श्री अर्जुन तुकाराम झाडे, आमला, ता. हिंगोली यांनी सुचित केले की,** वाळुचा लवकरात लवकर लिलाव गरजेचे आहे जेणेकरुन रात्री बेरात्री वाळुचे अवैध उत्खनन होणार नाही.

श्री जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, पर्यावरण समतोल ठेवण्यासाठी शासन निर्देशानुसार जाहीर लोकसुनावणी घेणे बंधन कारक आहे. सदरील लोकसुनावणीसाठी ठरवुन दिलेल्या कालमर्यादेप्रमाणे मंजुरीसाठी लागणा-या वेळेत गावस्तरावर नदीपात्रातील वाळुचे अवैध उत्खनन होणार नाही याकरीता संबंधीत गावचे तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

वाळुघाटाचा लिलाव झाल्यानंतर लिलावधारकाकडुन अटी व शर्तीचे पालन अंमलबजावणी होते किंवा नाही याबाबत खबरदारी म्हणुन समितिने दक्षता घ्यावी.

डॉ. प्रविण जोशी, प्रादेशिक आधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद यांनी सुचित केले की, लिलावधारकाने अपेक्षित खर्चाप्रमाणे पर्यावरण संवर्धनासाठी अमंलबजावणी करावी.

श्री. सो.म. कुरमुडे, यांनी उपस्थितांना विचारले की, अजुनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणी अध्यक्ष्यांच्या परवानगीने सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **सो.म. कुरमुडे** | **डॉ. प्रविण जोशी** | **जितेंद्र पापळकर** |
| (समन्वयक) | (सदस्य) | (अध्यक्ष) |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक आधिकारी, | जिल्हादंडाधिकारी, हिंगोली. |
| म.प्र.नि. मंडळ, परभणी. | म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद. | |

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दुरध्वनी ०२४५२ - २२६६८७
sroparbhani@mpcb.gov.in
Web:www.mpcb.gov.in

उप प्रादेशिक कार्यालय,
पहिला मजला, रंगनाथ महाराज नगर,
नांदखेडा रोड, परभणी ४३१४०१

जा कं. म.प्र.नि.मं/उप्राकाप/०४

दिंनाक :- १८/०१/२०२२.

प्रति,

सहसंचालक (ज.प्र.नि.)
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
मुंबई.

विषय :- प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा- हिंगोली यांच्या हिंगोली, वसमत, कळमनुरी व औंढा नागनाथ तालुक्यातील एकंदरीत १५ वाळूघाटाचे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत

संदर्भ :- आपले पत्र दिनांक २८/१२/२०२१.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा- हिंगोली यांच्या हिंगोली, वसमत, कळमनुरी व औंढा नागनाथ तालुक्यातील एकंदरीत १५ वाळूघाटातील वाळू/रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि. ५-०१-२०२२ रोजी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे संपन्न झाली.

सदर जाहीर लोकसुनावणीचे इतिवत्त मराठी व इंग्रजीमध्ये पर्यावरण व्यवस्थापन अहवाल, छायाचित्रे, हजेरीपट, व्हिडीओ डिव्हीडी, वर्तमानपत्रातील मराठी व इंग्रजी जाहीराती ईत्यादी या पत्रासोबत जोडली आहेत

आपल्या माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

सोबत :- वरील प्रमाणे

(सो. म. कुरमूडे)
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद.

प्रत माहितीस्तव सादर :-
१) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
२) प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद.
३) जिल्हा खनिकर्म आधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.